प्रकरण – दोन

# संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन

# प्रकरण - दोन

## संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन

२.१ प्रस्तावना

२.२ संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन

२.३ समारोप

=-=-=-=-=

# प्रकरण - दोन

## संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन

## २.१ प्रस्तावना :-

प्रकरण एक मध्ये संशोधन विषय, पार्श्वभूमी, गरज, उपयुक्तता, महत्व, उद्दिष्टये, व्याप्ती आणि मर्यादा यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी निवडलेल्या विषयाच्या संबंधित परिचित साहित्य आणि संशोधन याचा अभ्यास केला आहे. शिवाय संशोधन विषयाशी संबंधित अशा लेखाचा परामर्श घेतला आहे. त्याची थोडक्यात सारांश रुपाने माहिती दिलेली आहे.

## २.२ संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन :-

प्रस्तुत विषयाशी संशोधनात्मक अभ्यासाचा शोध घेण्यासाठी संशोधकाने पुढील ग्रंथाचे अवलोकन केले.

[१] दि थर्ड इंडियन इयर बुक ऑफ एज्युकेशनल रिसर्च, एन. सी. ई. आर. टी. न्यू दिल्ली.

[२] दि सर्वे ऑफ रिसर्च इन इज्युकेशन संपादक डॉ. एम. बी. बुच, सेन्टर ऑफ ॲडव्हान्स स्टडी इन एज्युकेशन, दि. एम. एस. युनिव्हर्सिटीज, बरोडा.

[३] एज्युकेशन इनव्हेस्टीगेशन इन इंडियन युनिव्हर्सिटीज [१९३९-१९६१] एन. सी. ई. आर. टी., न्यू दिल्ली.

[४] एज्युकेशन इनव्हेस्टीगेशन इन युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र [१९३९-१९७०] स्टेट इन्स्टीटयूट ऑफ एज्युकेशन, पुणे - ३०.

[५] दि सेकंड सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन [१९७२-७८] संपादक डॉ. एम. बी. बुच, सोसायटी फॉर एज्युकेशनल रिसर्च अँड डेव्हलपमेंट, बरोडा.

[६] एज्युकेशनल रिसर्च इन दि युनिव्हर्सिटीज ऑफ बॉम्बे संपादिका डॉ. [सौ. ] प्रतिभा देव, डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशन, युनिव्हर्सिटीज ऑफ बॉम्बे १९८१.

[७] एज्युकेशनल रिसर्च इन युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र प्लॅटिनम ज्युबिली इअर व्हाल्यूम, संपादक डॉ. एन. के. पाटोळे, एस. टी. कॉलेज, बॉम्बे १९८३.

वरील ग्रंथा व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या वतीने प्रसिध्द होणारे " रिसर्च बुलेटिन " या त्रैमासिकाचे सर्व अंक त्याच प्रमाणे असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज यांच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या "युनिव्हर्सिटीज न्यूज" या साप्ताहिकातील "थिसीस ऑफ द मंथ" या सदराखाली प्रसिध्द होणाऱ्या विद्यापीठानी स्वीकृत केलेल्या प्रबंधाची नांवे चाळली.

या सर्वाचे नीट काळजी पूर्वक अवलोकन केले असता प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित आढळून आले नाही. या दृष्टीने प्रस्तुत संशोधन मूलभूत आणि नाविन्यपूर्ण आहे असे म्हणता येईल.

परंतु शिक्षण प्रक्रियेतील इतिहास विषयाच्या अध्यापन-अध्ययनात वापरल्या जाणाऱ्या पाठयपुस्तक व मार्गदर्शकाच्या संदर्भात झालेल्या व प्रस्तुत संशोधन विषयाशी थोड्याफार प्रमाणात संबंधित असणाऱ्या काही संशोधनाचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे. शिवाय प्रस्तुत संशोधन विषयावर प्रसिध्द झालेल्या लेखांचा थोडक्यात परामर्श घेतला आहे.

I) "Critical study of the present position of teaching History in Secondary School of Solapur District" By Prof. R. N. Ingole, College of Education, Barsi, March 1985.

"सोलापूर जिल्हयातील माध्यमिक शाळातून शिकविण्यात येत असलेल्या इतिहास विषयाच्या अध्यापनाचा चिकित्सक अभ्यास"

हा संशोधन प्रकल्प शिवाजी विद्यापीठाच्या पीएच. डी. या पदवीसाठी डॉ. इंगोले आर. एन. यानी मार्च १९८५ साली पूर्ण केला.

शोध अभ्यासाची उद्दिष्टये :-

[१] इतिहास शिकविणा-या शिक्षकांची ही विषय शिकविण्याची कितपत पारंगतता आहे याचा शोध घेणे.

[२] पाचवी ते दहावी हया वर्गातील हया विषयाचा अभ्यासक्रम व पाठयपुस्तक या संदर्भात सध्याची स्थिती काय आहे हयाचा अभ्यास करणे.

[अ] इतिहास शिकविण्याची पध्दती अथवा दिशा.

[ब] इतिहास विषय शिकविण्या बाबतची साधने अथवा आधारभूत बाबी.

[क] इतिहास विषय शिकविण्यास संबंधित असे सहशालेय कार्यक्रम अथवा अभ्यासपूरक कार्यक्रम.

[ड] इतिहास विषयासाठी वेगळी अशी वाचनालयीन सुविधा म्हणजे इतिहास मंदिर व तत्संबंधीच्या कार्यवाही.

[३] सध्या शिकविल्या जाणा-या इतिहास या विषयासंबंधी

काय व कोणत्या सुधारणा करता येतील अथवा त्याबद्दल कोणत्या उपाय योजना करणे आवश्यक आहे, कोणते मार्ग शोधावे लागतील या बद्दलचा अभ्यास करणे.

संशोधन पध्दती :-

ह्या संशोधन प्रकल्पासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला गेलेला आहे. ह्या संशोधन अभ्यासासाठी संशोधकाने खालील साधनांचा अवलंब करून आवश्यक अशी माहिती जमा केली.

[१] प्रश्नावली
[२] मुलाखती
[३] भेटी, चर्चा व अवलोकन.

प्रश्नावली ही सहा भागात तयार करुन त्यामध्ये अभ्यासक्रम, अध्यापनाची उद्दिष्टये, अध्यापन पध्दती, शैक्षणिक साधने, शिक्षकांची तयारी, वाचनालय, इतिहास खोली, विद्यार्थ्यांचे गृहपाठ, स्वाध्याय आणि इतिहासातील मूल्यमापन इ. बाबी समाविष्ट केल्या गेल्या होत्या.

प्रश्नावली पोष्टाव्दारे सर्व इतिहास शिक्षकांना पाठविण्यात आली. तसेच सोलापूर जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील शिक्षकांना प्रत्यक्ष भेटून ती हाती देण्यात आली. त्यातील एकूण नव्वद प्रश्नावली पूर्णतया भरुन पाठविण्यात आल्या, त्याच पोच झाल्या.

या व्यतिरिक्त एकूण ६० मुख्याध्यापकांना व एकूण ३० तज्ञांच्या प्रश्नावली प्रमाणेच मुलाखती घेतल्या. तसेच संशोधकाने शहरी व ग्रामीण भागातील शिक्षकांशी, एकूण २० माध्यमिक शाळातून इतिहासाच्या अध्यापनाची प्रत्यक्ष पाहणी करुन कोणत्या सुविधा व सवलती उपलब्ध आहेत याची पाहणी केली. अशा प्रकारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करुन त्यांची एकूण ६६ भागात विभागणी केली. ह्या विश्लेषणानंतर निष्कर्ष काढलेले आहेत.

निष्कर्ष :-

[१] सोलापूर जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळातून इतिहासाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकापैकी ४५ टक्के शिक्षक हे अप्रशिक्षित होते. म्हणजेच इतिहास विषय परिपक्व-रित्या शिकविण्यास जी पात्रता आवश्यक आहे ती त्यांच्याकडे नव्हती.

[२] इतिहास विषय शिकविण्याकरिता शिक्षकांची कोणत्याही प्रकारची समाधानकारक अशी पूर्वतयारी नव्हती.

[३] इतिहासाची क्रमिक पुस्तके अचूक अशी नव्हती. विषयाची मांडणी योग्य अशा क्रमवारीने दिलेली नव्हती अथवा त्यांची पूर्वज्ञानाशी पूर्णपणे सांगड घातली नव्हती, व सुसंगतता राखली गेली नव्हती. काही घटक ढोबळ तसेच विस्तृत असल्याने ते विद्यार्थ्यांच्या ग्रहणशक्ती बाहेरचे ठरले होते, तसेच त्यातील भाषा सुलभ व सोपी नव्हती.

[४] इतिहास विषय शिकविण्याची उद्दिष्टये काही अंशी सफल झाली असे दिसून आले.

[५] बहुसंख्य शिक्षक फक्त कथन पध्दतीने इतिहास शिकवित असून त्यानी विद्यार्थी हा केंद्र बिंदू मानून बालक केंद्रित शिक्षण पध्दतीचा अथवा संशोधकाच्या दृष्टीने मूलभूत अशा पध्दतीचा वापर केला नाही. उदा. प्रकल्प पध्दती, आधार पध्दती.

[६] काही शिक्षक तर क्रमिक पुस्तकाचाच प्रामुख्याने वापर करीत असत. ते इतिहास पुस्तकाच्या आधारे जणू भाषा विषयाचा तास घेतल्या-प्रमाणे केवळ वाचून दाखवित होते.

[७] अनेक शिक्षकांनी इतिहास हा विषय शिकविण्यासाठी इतर आवश्यक अशा कोणत्याही योग्य अशा शैक्षणिक साधनांचा वापर केलेला नव्हता.

[८] जवळ जवळ सर्व शाळामधून इतिहास विषय शिकविण्यासाठी योग्य अशा साधन सुविधांची उपलब्धता नव्हती.

[९] बहुतेक शाळा मधून इतिहास विषय शिकविण्यासाठी वेगळी अशी इतिहास खोली अथवा इतिहास विषयाचे स्वतंत्र वाचनालय नव्हते.

[१०] १९८०-८१ व १९८१-८२ ह्या काळात इतिहास ह्या एका विषयात नापास होणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाण २३ टक्के इतके होते.

II) " An Investigation into the present Apathy towards teaching and learing of History in Indian Schools with particular reference to the Secondary Schools of Bihar", Ph.D. Education, Bihar University 1955.

"भारतातील माध्यमिक शाळेत इतिहास विषय शिकविण्यात व शिकण्यात दिसून येणा-या उदासिनतेचा बिहार राज्याच्या शाळेतील विशिष्ट संदर्भातील अभ्यास".

हा संशोधन प्रकल्प बिहार विद्यापीठाच्या शिक्षण शास्त्रातील पी. एच. डी. या पदवीसाठी डॉ. एन. पी. गुप्ता यांनी १९५५ साली पूर्ण केला.

शोध अभ्यासाची उद्दिष्टये :-

प्रस्तुत संशोधनाचे प्रमुख उद्दिष्टय असे की, भारतीय शाळातील इतिहास विषयाच्या अध्ययन-अध्यापनात दिसून येणा-या उदासिनतेचा बिहार राज्याच्या माध्यमिक शाळांच्या संदर्भात शोध घेणे.

अभ्यास संशोधनाची पध्दती :-

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला होता. या पध्दतीने आधार सामुग्री गोळा करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती निरीक्षण ह्या मूल्यमापन तंत्राचा अवलंब केला होता. या साधनाव्दारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण करुन अर्थ लावला गेला व त्यावरुन खालील निष्कर्ष काढले गेले.

निष्कर्ष :-

[१] इतिहास अभ्यासक्रम अत्यंत क्लिष्ट असा होता व त्यात व्यक्तिगत अथवा मूलभूत गरजांचा विचार केला जात नव्हता.

[२] चांगल्या त-हेची इतिहास विषयाची पाठ्यपुस्तके तयार करण्याची काळजी घेतली जात नव्हती.

[३] विषय शिक्षक इतिहास विषय शिकविण्यात बिलकूल स्वारस्य घेत नव्हते.

[४] परीक्षा ह्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेशी पूर्णपणे निगडीत असतात. परंतु दोन्हींमध्ये तफावत आढळत होती.

[५] प्रश्न पत्रिकेचे स्वरुप हे जुनाट व पारंपारीक असे होते.

[६] अध्यापन पध्दती मधून फक्त इतिहासातील भूतकालीन घटना वर्णन करण्यावर भर दिला जात असे.

[७] राज्यांच्या शिक्षण प्रशासनात अत्यंत अपुरी अशी प्रशासकीय यंत्रणा होती.

III) " Teaching Social Studies in Secondary Schools of Uttar-Pradesh" Ph.D. Education, Lucknow University, 1969.

"उत्तर प्रदेशातील माध्यमिक शाळात शिकविण्यात येणारा समाजशास्त्राचा अभ्यास" हा संशोधन प्रकल्प लखनौ विद्यापीठाच्या पी. एच. डी. [शिक्षण शास्त्र] पदवीसाठी श्रीवास्तव एन. पी. यानी १९६९ साली पूर्ण केला.

शोध अभ्यासाची उद्दिष्टये :-

[१] समाजशास्त्राचा अभ्यास केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही-विषयी योग्य दृष्टीकोन, मनाचा कल, सामर्थ्य, चातुर्य वाढले आहे का हे पहाणे.

[२] समाजशास्त्राचा अभ्यास केलेले हे विद्यार्थी समाजशास्त्राचा अभ्यास न केलेल्या सहाध्यायापेक्षा कसे श्रेष्ठ व सरस आहेत हे पहाणे.

अभ्यास पध्दती :-

उत्तर प्रदेशातील आठ शैक्षणिक विभागातील एकूण १,१४७ विद्यार्थ्यांची या संदर्भात पहाणी करण्यात आली. एका विभागातील दोन शहरातील चार विद्यालये निवडण्यात आली. अशा प्रकारे एकूण १६ शहरातील ६० माध्यमिक शाळातून माहिती संकलित करण्यात आली. ही माहिती प्रश्नावली हया मूल्यमापन साधनाच्या आधारे संकलित करण्यात येऊन तिचे विश्लेषण करण्यात आले.

निष्कर्ष :-

[१] समाजशास्त्राचा अभ्यास हा यशस्वी ठरला असल्याचे दिसून आले. त्यामुळे विद्यार्थ्यात उच्च दर्जाचा प्रामाणिकपणा, विषयाची मनापासून आवड, अल्प संख्याकाच्या हक्काच्या बाबतीत योग्य व रास्त जाणीव, लोकशाही जीवन पध्दतीस आवश्यक अशी समाजाबद्दलची सदिच्छा व बांधिलकी यांची बळकटी इत्यादि गुण अंगी बाणल्याचे दिसून आले.

त्याच प्रमाणे लोकशाही व्यवस्थेमुळे लोकांना राज्यघटनेनुसार जे समान हक्क प्राप्त झालेले आहेत., त्याबद्दल सामाजिक निकोप असा दृष्टीकोन निर्माण करण्यास व त्याबद्दलची राजकीय जाण निर्माण होण्यास भरीव मदत झालेली आहे.

[२] या संशोधनात भूगोल या विषयाचा विशेष उल्लेख करावा वाटतो., कारण ह्याचा वरील बाबतीत विद्यार्थ्यात योग्य भावना रुजविण्यास भरीव अशी मदत झालेली आहे.

[३] इतिहासाच्या अध्यापनामुळे विद्यार्थ्यात = सामाजिक उच्च दर्जाचा प्रामाणिकपणा, स्वसन्मान व सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याची किती आवश्यकता आहे, ह्याची जाणीव निर्माण करण्यास मात्र इतिहासाचेअध्यापन अयशस्वी झालेले आहे. कारण ह्यामध्ये शिक्षणामुळे अल्पसंख्याकांचे हक्क आणि स्वतंत्र न्याय संस्था व लोकांच्या ह्या लोकशाही शासनात अत्यंत आवश्यक असतात ही भावना रुजविली गेली नाही.

IV) " A Critical Evaluation of School Text book Improvement Programmes in India," Ph. D. Education, punjab University, 1977."

"भारतातील शाळातील पाठ्यपुस्तकाच्या सुधारणा कार्यक्रमाचे चिकित्सक मूल्यमापन" हा शोध प्रबंध पंजाब विद्यापीठाला पी. एच. डी. पदवीसाठी १९७७ ला चौधरी आय. एस. यांनी सादर केला.

अभ्यास हेतू :-

[१] पाठ्यपुस्तक सुधारणा कार्यक्रमामुळे पाठ्यपुस्तकात झालेल्या सुधारणांचे स्वरुप आणि व्याप्ती ठरविणे.

[२] पाठ्यपुस्तक सुधारणातील त्रुटी आणि छपाई दोष शोधून काढणे.

[३] विविध पाठ्यपुस्तकांचे लिखाण, प्रकाशन, उत्पादन आणि उजळणी करणाऱ्यांच्या प्रयत्नांचे मूल्यमापन करणे.

[४] हा कार्यक्रम अधिक विश्वासार्ह आणि उपयुक्त बनविण्याच्या दृष्टीने सध्याच्या पाठ्यपुस्तक सुधारणा कार्यक्रमाचे मूल्य मापन करणे.

निष्कर्ष :-

[१] सर्व राष्ट्रीयकृत पाठ्यपुस्तके दिलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारेच लिहीली गेली होती.

[२] काही गणिताच्या पाठ्यपुस्तकामधील उत्तरात, भूगोल पाठ्यपुस्तकातील नकाशामध्ये आणि शास्त्राच्या पाठ्यपुस्तकातील काही घटनामध्ये गंभीर त्रुटी होत्या.

[३] एन. सी. ई. आर. टी. च्या काही पाठ्यपुस्तकांमध्ये आधुनिक ज्ञानाच्या समजेल अशा भाषेत समावेश होता.

[४] इंग्रजीच्या काही पाठ्यपुस्तकामध्ये, उदाहरणार्थ, दाखले हे एक चांगले वैशिष्ट्य होते तर गणिताच्या काही पाठ्यपुस्तकामध्ये असे दाखले कमी होते.

[५] अभ्यासक्रम, वस्तुनिष्ठ प्रश्न, संदर्भ ग्रंथाची यादी यांचा राष्ट्रीयकृत पाठ्यपुस्तकामध्ये अभाव आढळला.

[६] एकंदरीत इंग्रजी माध्यमातील सार्वजनिक, कॉनव्हेंट, ॲंग्लो-इंडियन शाळामध्ये वापरल्या जाणाऱ्या पुस्तकांमध्ये भाषा, मजकूर, उदाहरणे, स्वाध्याय, छपाई, कागद, बांधणी आणि किंमत या गोष्टी राष्ट्रीयकृत पाठ्यपुस्तकापेक्षा सरस होत्या.

V) " An Evaluation of Nationalised Text books for Higher Classes in Social Studies in Secondary Schools of Andhra Pradesh", Ph. D. Education, MS. University, 1973.

" आंध्र प्रदेशातील माध्यमिक शाळातील समाजशास्त्राच्या उच्च वर्गासाठी असलेल्या राष्ट्रीयकृत पाठ्यपुस्तकांचे मूल्यमापन" हा पी. एच. डी. पदवीसाठी शोध प्रबंध एम. एस. विद्यापीठाला १९७३ साली पट्टाभिराम जी. यांनी सादर केला.

अभ्यास हेतु :-

समाजशास्त्राच्या राष्ट्रीयकृत पाठ्यपुस्तकांचे दोष व त्रुटी शोधून काढणे, त्यावर उपाय सुचविण्यासाठी त्याचे मूल्यमापन करणे, शिक्षक मुख्याध्यापक, विद्यार्थी, अधिकारी आणि शैक्षणिक प्रकाशक यांच्या मदतीने हे मूल्यमापन केले.

निष्कर्ष :-

[१] सर्वसाधारणपणे सर्वच पुस्तकात पुरेसा मजकूर होता पण काही घटकात नवा मजकूर हवा होता.

[२] सर्व राष्ट्रीयकृत पाठ्यपुस्तके त्यांच्या बाह्य वैशिष्टाबद्दल समाधानकारक होती., पण आकार, बांधणी व आवरण यात सुधारणा करण्यास वाव होता.

[३] दहावीसाठी असणाऱ्या राष्ट्रीयकृत पाठ्यपुस्तकाच्या मजकूराची मांडणी सुमार दर्जाची होती.

[४] संदिग्धता, अस्पष्ट मांडणी यामुळे आठवी ते दहावी पाठ्यपुस्तकातील उदाहरणे अपुरी व सुमार दर्जाची होती.

[५] अपुरी माहिती आणि स्वाध्याय यांची उपक्रमाच्या हेतूनुसार पुर्नबांधणी करण्याची गरज होती.

[६] संदर्भ ग्रंथ सूची आणि पाठाचा सारांश यांना पुरेसे महत्व दिले गेले नव्हते.

[७] राष्ट्रीयकृत पाठ्यपुस्तके दर्जा व संख्या या बाबतीत जुन्या पाठ्यपुस्तकापेक्षा श्रेष्ठ होती पण सुधारणेला बराच वाव होता.

VI) "शिक्षक-पालक-विद्यार्थी एक विषमभुज त्रिकोण"

श्री. सुरेश रघुनाथ भिडे, वटावकर बिल्डींग, ब्लॉक नंबर ३, ब्राम्हण विद्यालया जवळ, चरई ठाणे यांच्या वरील लेख " भारतीय शिक्षण" मार्च १९८७ या शैक्षणिक मासिकात आला आहे. त्याचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

शिक्षक-पालक व विद्यार्थी या त्रिकोणातील परस्पर संबंधावर औपचारिक शिक्षण प्रक्रियेची मदार असते. कोणत्याही समाजाचे स्वास्थ ह्या तीन घटकावर अवलंबून असते. ह्या तीन घटकांमध्ये सुसंवाद व सुसूत्रता असेल तर राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करण्यासाठी निराळे प्रयत्न करण्याची जरुरी नाही. ह्या घटकामधील बंध इतके शिथिल झाले आहेत की, मन मानेल तसा प्रत्येक घटक भरकटत गेल्याने त्रिकोणाचा समतोल ढळून राष्ट्रवादाचा गुरुत्वमध्य त्रिकोणाच्या बाहेर जात आहे. ह्यापासून तात्कालीन फायदा काहींही नसल्याने तथाकथित बुध्दीवाद्यांकडून ह्या अतिशय महत्वाच्या प्रश्नांची सतत उपेक्षाच होत आली आहे. वरील पैकी प्रत्येक घटक महत्वाचा असून देखिल वेळ प्रसंगी शिक्षकांच्या कर्तव्याची जाणीव करुन देण्याव्यतिरिक्त शासनकर्ते व विचारवंत काहीच करत नाहीत. किंबहूना प्रत्येक जण दोषाचे खापर दुसऱ्यावर फोडतो आहे. कठोर परीक्षण करुन प्रत्येकाने वरील घटकामध्ये सुसंवाद कसा साधला जाईल ह्या दृष्टीने प्रयत्न केला पाहीजे.

घटक पहिला :- शिक्षक

घटक दुसरा :- पालक

[अ] अति जागरूक पालक

[ब] मध्यमवर्गीय नोकरी पेशातले पालक

[क] कमी शिकलेले, कामगार वर्गातले पालक

घटक तिसरा :- विद्यार्थी

[अ] उच्च श्रीमंत वर्गातले विद्यार्थी

[ब] मध्यम वर्गीय विद्यार्थी

[क] खालच्या थरातून आलेले विद्यार्थी

नवीन आकृतीबंध कितीही आणले, कितीही आयोग नेमले तरी जोपर्यंत शिक्षक, पालक व विद्यार्थी ह्यामध्ये समन्वय साधायचा प्रयत्न होत नाही, तोपर्यंत ती वरवरची मलमपट्टी ठरेल. त्यातून निर्माण होतील ते तथाकथित प्रोफेशनल, पोटभरू, स्वतःपुरतीच जाणीव ठेवणारे. सामाजिक बांधिलकी मानणारे राष्ट्रीय वृत्तीचे चारित्र्यवान नागरिक आपणाला घडवायचे असतील तर ह्या प्रश्नाकडे डोळे झाकून चालणार नाही.

२.३ समारोप :-

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनाच्या संबंधित संशोधनाची प्रत्येकी उद्दिष्टये, कार्यपध्दती व निष्कर्ष यांचे विवेचन केले आहे. शिवाय प्रस्तुत संशोधनाच्या संबंधित अशा लेखाचाही सारांशरूपाने परामर्श केला आहे. यांच्या अभ्यासावरून प्रस्तुत संशोधकास निश्चितपणे मार्गदर्शन लाभलेले आहे.

—x—x—x—x—x—x—x—